<u>नियमित दिवाणी दावा क्र.३२८/२०२३</u>

(CNR No.MHSO22004862-2023)

## <u>निशाणी क्र.३८ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ अन्वये त्रयस्थ इसम अर्जदार यांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन असे की, सदर दाव्यातील वादी सौ.रतनबाई दत्तात्रय जाडकर या दिनांक ०४.१०.२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत वादी यांचे पश्चात त्यांना त्रयस्थ अर्जदार हे कायदेशीर वारस असून त्यांना दावा पुढे चालवायचा आहे. अर्जदार यांना वादी म्हणून समाविष्ट करणेसाठी व त्यांना दाव्याचे कामकाज चालविणेकामी त्यांना सदर दाव्यात वारस म्हणून समाविष्ठ करणे गरजेचे आहे. करीता अर्जात नमूद दुरुस्तीस परवानगी मिळणेची विनंती केली.

३. प्रतिवादी तर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून कथन केले आहे की, अर्ज मुदतीत नाही. करीता अर्ज नामंजूर करावा. जर अर्ज मंजूर झालेस वादीवर खर्च बसवण्यात यावा.

४. प्रस्तुतचा अर्ज, अर्जावरील म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने अतिक्रमण क्षेत्राचा ताबा मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादी दाव्याचे कामकाज चालू असताना दिनांक ०४.१०.२०२५ रोजी मयत झाल्याबाबत अर्जदारांनी शपथेवर कथन केले आहे तसेच मृत्युचा दाखला दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी विहीत मुदतीमध्ये दाखल केला नसल्याचे अर्जान्वये दिसून येते. परंतु वादी च्या मृत्युपश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज विहीत मुदतीत दाखल झाला नसल्याने अर्ज नाकारणे न्यायोचित ठरत नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींच्या कथनास कोणतीही बाधा येत नाही. याउलट दाव्याचे कायदेशीररित्या कामकाज चालविणे दोन्ही पक्षकारांना सोयीस्कर होणार आहे. तसेच सदरची दुरुस्ती ही न्यायदान कामामध्ये मदत करणारी आहे. करीता, पुढील आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांनी अर्जात सुचवलेली दुरुस्ती दाव्यामध्ये निशाणी क्र.१ वर १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्त दाव्याची प्रत विहीत मुदतीत दाखल करावी.

३. खर्चाबाबत तुर्त आदेश नाहीत.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2026.02.09 13:47:42 +0530

स्थळ - करमाळा
दिनांक - ०६.०२.२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | : | 06.02.2026 |

Order/Judgment signed
by the Presiding Officer on : 06.02.2026

Order uploaded on : 09.02.2026